राष्ट्रोध्दाराय तंत्र शिक्षणम्

सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६५६२३८
E-mail : ropune@dtemaharashtra.gov.in
Web : www.ropune.org.in

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

---

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-३(ब)/बाउप्र/२०२२/ ०५ दिनांक : 0 5 JAN 2022

प्रति,

प्राचार्य / संचालक / उपसचिव,
सर्व शासकीय संस्था / कार्यालय.

**विषय : कोरोना विषाणू प्रसारास प्रतिबंधात्मक उपाय म्हणून बायोमेट्रिक उपस्थिती प्रणालीचा वापर मर्यादित कालावधीसाठी स्थगित करणेबाबत..**

संदर्भ : महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक समय २०२०/ प्र.क्र.३१/१८/(र.वका.), दिनांक ०५ जानेवारी, २०२२.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कोरोना विषाणूच्या " ओमायक्रॉन " व्हेरियंटमुळे रुग्ण वाढीच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांमधील बायोमेट्रिक उपस्थिती प्रणालीचा वापर सद्य:स्थितीत संदर्भित आदेशाच्या दिनांकापासून दिनांक ३१ जानेवारी, २०२२ पर्यंत स्थगित करण्यात आलेला आहे. (सोबत सदर शासन निर्णयाची प्रत जोडली आहे.)

तरी सदर कालावधीत अधिकारी / कर्मचारी यांची कार्यालयातील / संस्थेतील उपस्थिती हजेरी पटावर नोंदविण्यात यावी.

तसेच संस्थेत / कार्यालयात कोविड १९ साथरोगाचा प्रसार रोखण्याचे दृष्टीने सोशल डिस्टंसिंग, फेस मास्क परिधान करणे, सॅनिटायझेशन इत्यादीबाबत मार्गदर्शक तत्वांचे अनुपालन करणे.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

सोबत : वरील प्रमाणे.

प्रत : ह्या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी.

E:\my documents\Office Timing.docx\71

कोरोना विषाणू प्रसारास प्रतिबंधात्मक उपाय
म्हणून बायोमेट्रीक उपस्थिती प्रणालीचा वापर
मर्यादित कालावधीसाठी स्थगित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : समय २०२०/प्र.क्र.३१/१८(र.वका.)
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०५ जानेवारी, २०२२.

**शासन परिपत्रक:-**

कोरोना विषाणुने बाधित होणा-या रूग्णसंख्येत मोठया प्रमाणात वाढ होत आहे. कोरोना विषाणुच्या "ओमायक्रॉन" व्हेरियंटमुळे रूग्ण वाढीचा दर दिवसेंदिवस उंचावत आहे. मंत्रालयातील तसेच राज्यातील सर्व शासकीय कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांची कार्यालयीन उपस्थितीची नोंदणी बायोमेट्रीक प्रणालीवर करण्यात येत असल्याने त्यामधून रोगप्रसाराचा अधिक धोका असल्याने सदर प्रणाली तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करणे अत्यावश्यक आहे. कोरोना विषाणुच्या "ओमायक्रॉन" व्हेरियंटमुळे रूग्ण वाढीच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून कार्यालयीन उपस्थिती बायोमेट्रीक प्रणाली संदर्भात खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

अ) मंत्रालय व नवीन प्रशासकीय इमारतीच्या कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांची कार्यालयीन उपस्थिती नोदविण्यासाठी बसविण्यात आलेल्या बायोमेट्रिक मशिन्स पुरेशा प्रमाणात नसल्यामुळे, उपस्थिती नोंदविताना होणारी गर्दी व गोंधळ टाळण्यासाठी मंत्रालय व नवीन प्रशासकीय इमारतीच्या प्रत्येक मजल्यावर बायोमेट्रिक मशिन्स बसविण्याबाबत माहिती तंत्रज्ञान विभागाने १५ दिवसात कार्यवाही करावी.

ब) मंत्रालय व नवीन प्रशासकीय इमारतीच्या प्रत्येक मजल्यावर बायोमेट्रिक मशिन्स माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत बसविण्यात येईपर्यंत, मंत्रालय व नवीन प्रशासकीय इमारतीच्या कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांच्या कार्यालयीन उपस्थितीकरिता बायोमेट्रीक प्रणालीचा वापर पुढील आदेशापर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

क) मंत्रालय व नवीन प्रशासकीय इमारती व्यतिरिक्त, राज्यातील इतर सर्व शासकीय कार्यालयांमधील अधिकारी/कर्मचारी यांच्या कार्यालयीन उपस्थिती संदर्भात संबंधित कार्यालयामध्ये पुरेशी बायोमेट्रीक मशिन्स उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने संबंधित कार्यालय प्रमुखांनी आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. सद्य: स्थितीत बायोमेट्रीक उपस्थिती प्रणालीचा वापर दिनांक ३१ जानेवारी, २०२२ पर्यंत स्थगित करण्यात यावा.

२. मंत्रालय व नवीन प्रशासकीय इमारत व राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांमधील बायोमेट्रीक उपस्थिती प्रणालीचा वापर सद्य:स्थितीत या आदेशापासून दिनांक ३१ जानेवारी, २०२२ पर्यंत स्थगित करण्यात येत आहे. सदर कालावधीत अधिकारी / कर्मचारी यांची कार्यालयातील उपस्थिती हजेरी पटावर नोंदविण्यात यावी. या संदर्भात प्रशासकिय विभाग व क्षेत्रीय कार्यालयातील आस्थापना शाखांनी आवश्यक ती उपाययोजना करावी.

३. महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर सदर शासन परिपत्रक उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२२०१०५१३१३१५३८०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Indra Mallo

Digitally signed by Indra Mallo
DN: c=IN, o=Personal, 2.5.4.20=[illegible], postalCode=400021, st=Maharashtra, serialNumber=[illegible], cn=Indra Mallo
Date: 2022.01.05 13:14:24 +05'30'

( इंद्रा मालो )
सचिव (प्र.सु. र. व का.)

प्रत :

१. मा.राज्यपाल यांचे सचिव (५ प्रती),
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य,
८. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव(५ प्रती), मंत्रालय, मुंबई ४०००३२.
९. मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
१०. सर्व मा.मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
११. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
१२. मा.महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य,
१३. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
१४. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
१५. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई
१६. प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय,
१७. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
१८. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१९. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
२०. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई,
२१. राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, मुंबई,
२२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (५ प्रती ),
२३. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरेक नं.१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई ४०००२०.
२४. इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस(आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-४०००२५.
२५. नॅशनलीस्ट काँग्रेस पार्टी, ठाकरसी हाऊस, जे.एन.हेरेडीया मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई ४०००३८.
२६. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-४०००२८.